**<u>नियमित फौजदारी खटला क्र.१३९/२०१६</u>**
**<u>निशाणी क्रमांक - १५</u>**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १</u> :-**
मी देवाशपथ खरे सांगतो की

माझे नाव - सागर संजय घोलप
वय - २९ वर्षे, धंदा - शेती
राहणार - हनुमंतगाव, ता.राहाता, जि.अहमदनगर.

........

**<u>सरतपास - अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकिल श्री.एस.जी. पाटील</u>** :-

१. दि. १७.०६.२०१६ रोजी मला व दुसरा पंच सागर वाघमारे यांना पो.ना. गागरे यांनी मुंबादेवी जनरल स्टोअर्स पाथरे शिवारात पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. पंचनामा कशाचा होता ते मला आठवत नाही. त्यावेळी तेथे कोण होते ते मला आठवत नाही. तेथे ट्रक होता परंतु त्यात काय होते ते मला माहित नाही. मला वाळु जप्ती संबंधी घटनास्थळाच्या पंचनाम्यासाठी बोलावले होते किंवा कसे ते मला सांगता येणार नाही. आता मला दाखवलेल्या पंचनाम्यावरील क्र. १ ची सही माझी आहे. त्यातील मजकुराविषयी मला काही सांगता येणार नाही. साक्षीदाराने सही मान्य केल्यामुळे त्यास **नि.क्र. १६** देण्यात येत आहे.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ श्री. एस. जी. पाटील यांच्या तोंडी विनंतीवरुन भा.पु.का. १५४ अन्वये साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याची संधी देण्यात येत आहे.**

२. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी मला त्यावेळी वाळु जप्तीच्या गुन्ह्यासंबंधी घटनास्थळाचा पंचनामा करायला बोलावले होते.

**प्रश्न -** घटनास्थळ पो.ना अनारसे यांनी दाखवले होते?

**उत्तर -** कोणी दाखवले होते ते मला माहित नाही.

हे मला आठवत नाही की पोलीसांनी तेथे दिसत्या परिस्थितीचा जागेचा पंचनामा करून आम्हाला वाचुन दाखवला व तो बरोबर असल्यामुळे आम्ही पंचानी त्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी खोटी

साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. व्ही.बी.पठारे :-**

नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-
( एस. व्ही. खैरे)
प्रथम वग  न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र. १, राहाता.

दि.२०/१२/२०२४